# प्रकरण पाचवे

## 'महापूर' या कथासंग्रहाचे विशेष (आशय आणि अभिव्यक्तीच्या अनुषंगाने)

# प्रकरण ५

## महापूर या कथासंग्रहाचे विशेष

### "महापूर" : या कथासंग्रहातील कथांच्या मांडणीचे स्वरूप :

**'महापूर' :-** जाखले गावात हिरा ही विधवा आहे. तिला तीन मुलं आहेत. दोन कळती तर एक लहान अंगावरचं आहे. नवरा मरून गेलेला नवऱ्याच्या माघारी गावाचा रोजगार करून ती आपले व आपल्या मुलांचे पोट भरत असते. दिवस पावसाळ्याचे. पाऊस जोराचा. चार दिवस उघडला नाही. हाताला काम नाही. खायला अन्न नाही. कंबरला एक पैसा नाही. अशा दिवसात कोणी उसनं-पासनंही करत नाही. तिने दोन दिवस कसे तरी घालवले आणि तिच्या मनात आपण भावाकडे चार दिवस जावे राहण्यासाठी ! ती जायला निघते. उभ्या पडत्या पावसात आपल्या तीनही पोराना घेऊन ती जांभुळवाडी ओढ्याच्या पलिकडे असलेले तिचे माहेराकडे जायला निघते. भाऊ खाऊन पिऊन सुखी असलेला. जाताना ओढा भरून वाहत असतो. तो पार करून भावाच्या घरी येते. भावानं तिचं प्रेमानं स्वागत केले. वैनीने चहा केला. ती चहा घेते. मुलांना जेवू घालते. पण आज राच्यारात रहा असं म्हणताच आणि वैनीचं तिड्यातील बोल हिराला कळते आणि आपलं मोडकं तोडकं कसंही असलं तर आपलच घर ! भावाच काय नाही पण वैनीला अडगळ नको. आपण आल्यानं त्यांच्यात भांडण नको. ती तात्काळ जायला निघते. पाऊस पडतच असतो. पण त्याचा जोर जास्त असतो. ती आपल्या तिन्ही मुलांना घेते आणि आपल्या गावाची वाट धरते. पावसाचं पाणी, तिच्या डोळ्यातील पाणी गळगळ वाहत असते. ती पुन्हा ओढ्याजवळ येते तर ओढ्याचं पाणी वाढलेलं. ती तशातही जायचा निर्णय घेते. मनात देवाचा धावा करते. ती पाण्यात उतरते. मुलांना सर्जा, सखीला पलिकडे पोहोचवते आणि शेवटी बाळाला आणण्यासाठी जावून परत येत असता पाण्यात पाणी वाढते आणि तिच्या पायाखालची वाळू सरकते. मनातून ती देवाचा धावा करते पण आपण आता जगत नाही. पोराना शेवटचं पाहते. सर्जा, सखी

ओरडत असतात त्यांना जवळच्या वस्तीवर जायला सांगते. इकडे ती पुरातून वाहून जाते. शेवटी पूर ओसरतो. पुराच्या वताला हिरा आणि बाळ एकमेकांच्या मिठीत असतात. जांभुळवाडीत जाखल्यात बातमी पसरते. नायकू या हिराच्या भावाला शंका येते, तो पाहतो. हंबरडा फोडतो. सर्जा, सखीला तो उराशी धरून रडतो. मीच मारलं तुझ्या आईला असे. तो लहान मुलांना म्हणतो. अतिशय हृदयस्पर्शी भावनाप्रधान कथेत लेखकाने प्रसंगाचं यथार्थ चित्रण केले आहे.

**अदावत :** ग्रामीण एकत्रित कुटुंबातील ही कथा आहे. धुर्पा आणि तिचा म्हातारा मालक त्यांना तीन मुलं सून, नातवंडं असं मिळून १५/१६ माणसांचं हे कुटुंब एकत्रित गुण्या गोविंदाने राहातात. धुर्पा म्हातारीचा सर्वांवर दरारा होता. तिचा शब्द कोणी मोडत नव्हतं पण एक दिवस घरात म्हातारीचा पैशाचा बटवा जातो नव्हे थोरला शिवराम मुलगा म्हैस खरेदीसाठी पैसे कमी येतील म्हणून घेऊन जातो. म्हातारी आंघोळ करत असते. तो सांगायचं राहून जातो. अनसा कमळा आणि धाकटी सून मधली कमळा तिची बहिण चार दिवस पाहुणी म्हणून आलेली तर थोरलीची लेक मंगला बाळंतपणासाठी आलेली. म्हातारी आपल्या बटव्याचा शोध घेते. सापडत नाही. सर्वांना विचारते. म्हातारा सांगतो उगीच माझ्यावर सूनावर अदावत घेऊ नकोस. म्हातारीनं कोंबड्याचं आणि किडूनमिडूक विकून पै-पै साठवलेले असते. ती चोरीला गेली. दिवसभर घरात कोणी जेवलेलं नसतं. प्रत्येकजण एकमेकावर मनात अदावत घेत असतो. म्हातारी पूर्ण व्याकूळ होते. तिचा अनेकावर अदावत असते. म्हणून गावातील आकणी जोगतीणीकडे जाते. आकणी जोग घेऊन घरात येते. पुजा मांडते. अंगात आणते. प्रत्येक सुनेला पाहुणीला भंडारा लावते. आकणी अंगात आणून म्हणते हितं हाताला पैस तुझं लागल्यात पण दात बी आपलच आणि ओढ बी आपलच. म्हातारी काय समजायचं ते समजते. एवढ्यात शिवराम म्हैस घेऊन दारात येतो तो हे सर्व पाहतो आणि म्हातारीला सांगतो मीच तुझा पैशाचा बटवा नेला होता. आकणी आपला जोग घेऊन केव्हाच पळून गेलेली असते. आनसा थोरली घरातील बाकरीचं बुटं म्हैशीपुढे ठेवते. मधली कमळा म्हैशीची पूजा करते. म्हातारी मात्र पूर्णपणे विरघळून गेलेली असते. ती मनात म्हणते, मी कारणाशिवाय अदावत सर्वांच्यावर घेतली. ग्रामीण एकत्रित कुटुंबात एखाद्या गोष्टीवरून किती ताणतणाव निर्माण होतो. प्रत्येकाला वेठीस कसे धरले जाते याचे चित्रण या कथेत आले आहे.

**लेकावळा :** – लेखक खोत यांची ग्रामीण भागातील पहिल्या पिढीनं लग्नाशिवाय संसार केलेला मुलंबाळं झालेली पण तिसऱ्या पिढीपर्यंत या मुलाचे लग्न होताना किती अडचणी येतात यावर प्रकाश टाकला आहे. ग्रामीण जीवनात जातीचा असून कसा जातीबाहेर ठेवलं जातं हे तरूण गणपाचे लग्न जुळवताना शंकर आण्णांना व किसा काकूला याचा अनुभवं येतो. घर तसं भरलेलं, चार एकर मळा, मुलगा एकटाच. पण शंकर आण्णा हा गणपतच्या आज्यानं ठेवलेल्या बाईपासून झालेला हे सर्व गावाला माहीत, पण शंकर आण्णा वरच्या कुळात आपल्या मुलाला मुलगी शोधतो. काहीवेळा लग्न ठरतात. अशी दोन लग्न ठरतात. साखर भांत होतो आणि पुन्हा गणपाचं लग्न मोडतं. किसाकाकू शंकर आण्णा विचारात पडलेली असतात. कुणीतरी गावातील भावकीतील पै-पाहुण्याचं कान भरतात अन् लग्न मोडतं. त्यामुळे गणपा ही हतबल होतो. तो शेंवटी शंकर आण्णांना सांगतो, माझ्या लग्नाचं तुम्ही आता बघू नका. माझं मी बघतो. घरात सकाळीच हा वितंडवाद सुरू असतो. सखारामतात्या हा शंकर आण्णाचा गावातील जवळचा मित्र तो येतो अन् गणपाची व शंकर आण्णाची समजूत घालतो. तात्या हा गावातील तसा चांगला माणूस लग्न व्यवहारात आणि गावातील घराघरांतला तिढा त्याला माहीत असतो. तो गणपाला सर्व समजून सांगतो. एक नाही तर दुसरी बघू या आणि आपलीच मुलगी गणपाला द्यावी असा विचार करून तो विचारतो. 'माझी सोयरिक चाललं का तुम्हास्नी ?' शंकर आण्णा - काकू अवाक् होतात. ते म्हणतात, जातीकुळीनं तुम्ही लई पुढचं तात्या. तात्या सांगतो - मी जातकुळ बघत नाही. भावकीला विचारत नाही. कारण त्यानं बदलत्या काळाचा परिस्थितीचा सारासार विचार केलेला असतो. अनेक पुढारी मंत्री मोठमोठी घराणी यात कसा बदल झाला आहे हे तात्यानं पाहिलेलं आहे. म्हणून तो शंकर आण्णाला शब्द देतो असा या कथेचा आशय आहे.

**ऐपत :–** गरीब घरातील लेक सुखाच्या घरात देण्यासाठी ऐपत नसतानाही केवळ मुलीला सुख लागावं म्हणून जीवाचं रान करणारी कमळाची कहाणी या कथेत मांडली आहे. कमळा काटकसर करून संसार करीत होती. दोन मुलं आणि संपत नवरा आजारी. मुलाला दहावीपर्यंत शिक्षण दिलेले. रूपानं गुणानं सुंदर असलेली ही मुलगी गावातीलच पवाराच्या घराण्यात तिचं लग्न जमतं. मुलगा शिकलेला, कारखान्यात नोकरीला. तीन चार एकर जमीन, मुलगी सुंदर असल्यानं हे जमतं. कमळाचं नशीब

चांगलं. लग्न होतं. सुला माहेराहून सासरी जाते. पण गरीब घरची असल्यानं हातावरचं पोट असल्यानं कमळाने काहीही दिलेलं नसतं. फक्त मुलगी आणि नारळ. त्यामुळं सासू, जावा तिला सारखं टोचून टोचून बोलतात. अपमान करतात. सुला सहन करत असते. सुलाला कालांतराने दिवस जातात. कमळा पै-पैसा जमा करते. जमिनीवर कर्ज काढते. मुलीला बोल नको म्हणून सगळी तयारी करून आणायला जाते. पण येताना तिची दुरडी रिकामी दिलेली असते. सुलाला मुलगी होते. पण कुणीही बघायला आलेलं नसतं. नवरासुध्दा आलेला नसतो, का विचारपूसही केलेली नसते. सुलाला आता पाठवणी जोरात करायची असे. कमळानं मनाशी ठरविलेलं असतं. ती पुन्हा पैसे जमा करते. सर्वांना कपडे घ्यायचे, कॉट गादी पाळणा सर्व करते. त्यासाठी तिने घरात हुत्याचं नव्हतं केलेलं असतं. शेळी, दोन कोकरास विकलेली असते. संपतचा जीव कोकरात शेळीत अडकलेला असतो. पण इलाज नसतो. सासरा घेऊन जाण्यासाठी येतो. कमळा संपत घालवायला गेलेली असतात. हळदी कुंकुवाला आलेल्या बायका कौतुक करीत असतात. पण थोरली जाऊ म्हणते कर्ज काढून केलं असेल. आता बस म्हणावं जन्मभर फेडत. हे कमळाच्या आणि सुलाच्या कानांवर जातं. त्याचं काळीज चिरत जातं. ऐपत नसतानाही गरीबानं केलेला खर्च श्रीमंतांना कसा बोचतो हे या कथेतून लेखकाने दाखवले आहे. संपतला भाऊजी चांगले कपडे घ्यायचे ठरवतो. पण संपत नको म्हणतो. त्याला बाजारात आपली कोकरं दिसतात. त्यातील एक कोकरू घेऊंन द्या असं भाऊजीला म्हणतो. भाऊजी त्याच्याकडं बघतच राहतात. असा या कथेचा आशय आहे.

**वाटणी :-** लिंबाजी आणि भागू या म्हातारा- म्हातारीची आयुष्याच्या अखेरची परवड येथे लेखकाने मांडली आहे. दोन भावाच्या वाटणीत म्हातारा लिंबाजी हा थोरल्याकडं भिमरावाकडं वाटून येतो तर धाकट्याकडं म्हातारी असते. भिमरावाला सोपान आणि जयसिंग दोन मुलं असतात. ती शाळा शिकत असतात. म्हातारा मळ्यात वस्तीला असतो. धाकट्याची लहान लहान मुलं म्हातारी सांभाळत असते. म्हातारी दिवस ढकलत असते. म्हातारा मळ्यात दुचागती होऊन असतो. एक दिवस म्हातारी फडक्यात दोन भाकरी, खर्डा, दही आणते. मळ्यात म्हाताऱ्याला खायला घालते. म्हातारा जीर्ण झालेला असतो. पण म्हातारी त्याला सांगते तुम्हाला चैन कसा पडतो. म्हातारा म्हणतो मग काय करू म्हणतीस ? हातातला बाण सुटला,

दोरी तुटली, आता काय करायचं ?' म्हातारी म्हणते, 'हाडाचं काडं करून रातध्याड मळ्यात राबून ह्यास्नी लहानचन मोठं करून हीच आपली दशा वाटताना अपला हिसा बाजूला काढाय पाहिजे होता.' दुसऱ्याचं बोलणं खात डोळ्याच्या पाण्याबरोबर भाकरी खावी लागते. म्हातारा समजावतो. 'पिकलं पान गळून पडल काय किंवा कुणी तोडलं काय सारखच.' तशी म्हातारी रडते. थोरला मुलगा येतो. आईला बोलतो. त्याची पुन्हा ताटातूट करतो. म्हाताऱ्याला भिमराव म्हणतो, 'आबा, तुम्ही तुमच्या आई वडीलांची वाटणी तात्यानं आणि तुम्ही केली होती. तेव्हा का गप्प बसला होता.' लिंबाजीला बोल लागतो. तो मनात उन्मळून पडतो. सोपान ह्या नातवाला आजोबा सांगतो. 'बाळ तुम्ही आई-बाची वाटणी करू नका.' आणि त्याला धाप लागते. तो धाडकन पडतो. प्राण सोडतो. असा या कथेचा आशय आहे.

**परवड :–** ही कथा दुष्काळातील विदारक सत्याचे वास्तव प्रत्ययकारी दर्शन घडवणारी कथा आहे. दुष्काळामुळं संपूर्ण गावाचीच कशी परवड होते. त्यालच दुष्काळी कामावरचा मुकादमाची बेफिकीरी. डॉक्टरनं एका कुटुंबाची परवड करून एक चिमण्या बाळाचा कसा जीव घेतला. हे लेखकाने दाखवले आहे. दुष्काळामुळं संपूर्ण गाव हतबल झालेलं. दुष्काळी कामावर गावातील सर्व स्त्री-पुरुष सर्व जाती जमातीचे लोक कामावर जात होते. दोन ब्रास मुरुम काढायचा. प्रत्येकाला वाटून दिलेलं. त्यात बारा रुपये रोजगार. रामा आणि सीता ही दारिद्रयातील कुटुंब. दुष्काळी कामावर जातात. मुलगी तीन वर्षाची चिमी. एक लहान मुल बरोबर असते. सर्वजण कामावर तुटून पडलेले. रामा सीता चिमी अन् लहान दोन दिवस उपाशी. घरातच काय नाही. मग खायचं काय. काही दिवस पाण्यावर दिवस ढकलून, दिवसभर उन्हात काम चाललेलं. चुकून चिमी रडत रडत आई-बा कडे येत असते तर शेजारच्या ज्ञानू मोहित्याचा टीकाव चिमीच्या डोक्यात लागतो अन् चिमी ओरडते. रामा आणि सीता गर्भगळीत होतात. सारी कामावरची माणसं जवळ येतात. चिमीचं रक्त मुरूमावर ब्रच सांडलेलं असतं. कोणीतरी सांगतं दवाखान्यात नेलं पाहिजे. रामाजवळ पै नसते. दिवाणजीकडं पैसे मागतो. दिवाणजी म्हणतो, माझं नाव सांग, पैसे घेणार नाहीत जावा दवाखान्यात आणि सिगारेट ओढतो. रामा सीता मुलीला दवाखान्यात नेतात पण पैसे नाहीत, मी औषध देणार नाही असे डॉक्टर सांगतात. रामा अन् सीताला आपण उभे असून कोसळत आहोत असे वाटते. चिमी गप्प झालेली असते. रामा

पोराला तिच्याजवळ ठेवतो. पुन्हा कामावर जातो. दिवाणजीला पैसे मागतो. दिवाणजी पुन्हा खेकसतो. तोपर्यंत चिमीनं जीव सोडलेला असतो. रामा दवाखान्याजवळ येतो. झाडाजवळ गर्दी पाहतो. गर्दीतून पुढे जातो. सीता रामाला पाहते अन् हंबरडा फोडते. चिमी निघून गेली. रामा चिमे चिमे करूनच उभाच खाली कोसळतो. असा आशय व्यक्त झालेली ही कथा दारिद्रयात दुष्काळ अन् दुष्काळात धोंड या परिस्थितीच्या रेट्यात सापडलेल्या रामाला अन् सीतेला मुलीला चिमणीला गमवावे लागते. डॉक्टरलासुध्दा दया आली नाही. दिवाणजीनं पैसे द्यायला टाळाटाळ केली. एकूणच ग्रामीण गरीब रामाची सीताची ही हृदयद्रावक कहाणी मनाला चटका लावून जाते.

**तोडगा :-** हौसा ही विधवा स्त्री आपल्या लेकीसाठी जीवाचं रान करून तिला मोठी करते. लग्न करून देते. पण तिच्या जीवनाची शोकांतिका होते. जीवघेण्या त्रासाला फुलाला सामोरे जावे लागते. त्यावर आपणच तोडगा काढला पाहिजे असं ठरवून ती त्या प्रकारे कशी तोडगा काढते हे या कथेत आले आहे. हौसाने मोठ्या नेटाने संसार केला. मुलीला सातवीपर्यंत शिक्षण दिलं. फुलं फुलासारखी होती. शिलाई काम शिकली होती आणि गावातील मोहित्याचा मधू तिच्या मागं लागतो. तिच्याशी लग्न करायचं ठरवतो. त्यासाठी म्हादू मामा व ज्ञानू तात्याला मध्यस्ती घालतो. दोघानी मिळून हौसाच्या मनात भरवितात. फुलाही तयार होते. लग्न होते. मधु उनाड, दारू, मटका जे काय करायचं ते तो करत असतो. लग्न होताच त्यात फरक पडत नाही. तो लाडात वाढल्यानं वाया गेलेला असतो. लग्न होत तरी तो वागण्यात सुधारणा करीत नाही आणि सासू मधुच्या आईला फुलाशी झालेलं लग्न नको असते. आपल्या भावाची मुलगी सून म्हणून तिला हवी असते म्हणून ती फुलाचा जाच करते. शिव्या घालते. पण फुला सहन करत असते. सासरा काहीच बोलत नाही. तो सासूच्या अधीन असतो. फुलाच्या जीवनाची परवड होते. शिव्या, मार तिला सहन करावा लागतो. हौसाच्या कानावर सर्व पडते. ती काळजीनं भयभीत होते. गावातच असल्यानं सासूने तिलाही शिव्या घातलेल्या असतात. ती बराच मार सहन करते. तिला गुप्तरोगही झालेला असतो. हौसा फुलाला दवाखान्यात नेते. सरळ करते. पुन्हा सासरी पाठवते. पण मागचेच पुढे होते. शेवटी फुला सहन न करता करारी बनते. आपणच यावर तोडगा काढायचं ठरवते. ती सासूला मारहाण करते.

नवऱ्याला मारते आणि आईने जेवढे दिलेले साहित्य असते ते माहेरी घेऊन येते. जमीन जुमला नावावर करून घेते. नवरा सोडून देते आणि आपल्या माहेरी हौसा आईकडे राहायला येते असा या कथेची आशय आहे.

**जोसरा :-** मारुती कानमोड्याचा भीमा देखणा उंचा पुरा पण डोक्यावर परिणाम होऊन गावभर हिंडत असतो, नाचत असतो. त्या दिवशीही तो बँडपुढे नाच करत असतो. सकानाना व शंकर तात्या हे पाहत असतात. पोरगं वाया गेलं म्हणून हळहळत असतात. त्याचं असं झालं भीमाचं लग्न झालं. महिना चार महिनं सुखात गेलं पण सासू खट्याळ तिनं भिमाची आणि त्याच्या बायकोची नजरा नजर होऊ दिली नाही. सासू - सुनला आपल्या जवळ झोपवते. पण मध्यान् रात्री ती सासऱ्याजवळ जाऊन झोपायची. इकडं सून रात्रभर तळमळायची. एके दिवशी तिही भिमाजवळ गेली. भीमा पैलवान गडी. त्याला बायको हवी असते. पण आईचा विरोध असतो. पोरगं खराप होईल. त्याची प्रकृती बिघडल. म्हणून काळजी. पण भीमा आणि बायको एक होऊन सोप्यात झोपाय लागली तशी आपला पोरगा बायकोच्या मुठीत जाईल. ही बया डोक्यावर मिरं वाटलं म्हणून ती त्या दोघांची ताटातुट करते. तिला माहेरहून कॉट, गादी घेऊन ये म्हणून माहेरी पाठवते. ती सून येतच नाही. तेवढ्यात मुलाचं दुसरं लग्न करते. पण तो भीमा दुसऱ्या लग्नाला तयार नसतो. बळजबरीनं त्याचं लग्न केलेले असते आणि पहिल्या बायकोसाठी तो झुरतो. त्यासाठी विचार करून करून अखेर त्याचं डोकं फिरतं आणि हे पोरगं असं वाया गेलं आज गावभर हिंडतय. नाचतंय. पहिली बायको गुणाची असते. त्यातूनही त्याला ती सांभाळते. पण भीमाला त्याची जाणीव आता राहिलेली नसते असा या कथेचा आशय आहे.

**पाटाचं पाणी :-** तात्या देसाई तसा खाऊन पिऊन सुखी माणूस. रकमा आणि तात्याचा संसार. रकमाला एक मुलगा असतो. तो चार वर्षाचा असतो. रकमाला पुन्हा दिवस जातात. तात्याला हायसं वाटतं आणि तात्या रात्रंदिवस काबाडकष्ट करताना त्याला अधिकच बळ येत जात. परंतु दिवस फिरतात. बाळंतपणात रकमा तात्याच्या भरल्या संसारातून उठून जाते अन् तात्याचं एकाकी जीवन वेदनामय होतं. रामचंद्राला मामा घेऊन जातो. रघुनाना सल्ला देतो की दुसरं लगीन कर. तात्यानं लग्न केलं. बायजा घरात आली पण तात्याचं संसारात लक्ष लागेना. तो दारूच्या

आहारी गेला. बायकोला मारझोड करू लागला. चार दोन वर्ष गेली. बायजा संसार सांभाळत होती. आठवड्याचा बाजारहाट तीच करायची. बाजारातल्या एका रहिमानच्या गळ्यात पडून तात्याच्या घरातून तात्याला सोडून निपाणीला निघून गेली. रहिमानबरोबर राहताना तिला एक मुलगी झाली. रहिमान तिच्याजवळ पैसा अडका होता तोपर्यंत राहिला. मुलगी १५, १६ वर्षाची झालेली. रहिमान आता तिचा राहिला नव्हता. बायजा पुढं अनेक प्रश्न असतात. मुलीचं काय करायचं. तिला कोडं होत. मुलीचा बा कोण म्हणून काय सांगायचं. शाळेत घालताना तिनं तात्याचं नाव लावलं होतं. मुलीला आपला बाप कोण माहीत नव्हतं. एके दिवशी रघुनानाची बायजाची निपाणीत भेट होते. बायजा नानाला आपल्या जीवनाची परवड सांगते. तिला खरा पश्चात्ताप होतो. आई, वडिलांच्या अगर नवऱ्याच्या घरी जायला तोंड नव्हतं. नानाला ती सगळं सांगते. जाताना म्हणते नाना मी येऊ का म्हणून विचारात पत्र घाला. मी येतो. आता जगावसं वाटत नाही. पण पोरीसाठी जगलं पाहिजे. या पोरीचा बाप आता धन्याबिगार नाही. नाना गावी येताच तात्याला सांगतो. तात्या चिडतो. तिला हजार शिव्या घालतो. पण स्वत:शीच विचार करतो खरं त्या पोरीची काय चूक ? ती बिचारी कुणा कुसाबाच्या गळ्यात कशी बांधायची ? मग मीच बाप झालो पाहिजे. त्याशिवाय त्या पोरीची सुटका नाय अन् बायजा अन् शालन आलेली असतात. बायाजा तात्याच्या गळ्यात पडून रडते. तात्या तिला कुरवाळतो. समजावतो. शेवटी पाटाचं पाणी पाटानंच गेलं पाहिजे. ही प्रतिकात्मक जाणीव लेखकाने येथे सूचित केली आहे.

**पाण्याविना मासोळी :–** मंजुळा या तरूणीची कारूण्याच्या भावनेनें ओथंबलेली हृदयद्रावक कथा आहे. मंजुळा आणि तिच्या वर्गातील माधव एकमेकाच्या प्रेमात पडतात. जे व्हायला नको ते होते. कालांतरानं माधव सैन्यात भरती होतो. तो परमुलखात असतो. मंजुळा त्याच्या आठवणीवर दिवस काढीत असते. लग्नही होत नाही. माधव सुट्टीवर येतो. पुन्हा त्या दोघांचा संबंध येतो आणि सुट्टी संपताच तो निघून जाते. मंजुळेचे आई-वडीलही तिला सोडून गेलेले असतात. दरम्यान मंजुळेला दिवस गेलेले असतात. ती माधवला पत्र पाठवते. तो सांगतो. माधव म्हणून तू त्याला जप. मी तुझ्याशी लग्न करेन. ती वाट पहात असते. दिवस पुढे ढकलत असते. आणि त्या दरम्यान लढाई सुरू होऊन माधव त्यात कामी आलेला असतो. हे जेव्हा

मंजुळेला कळते तेव्हा ती उन्मळून पडते. निसर्गपाखराशी ती संवाद साधते आठवणीशिवाय तिच्याजवळ काही नसते. लग्नाशिवाय मुलं नवऱ्याचा सहवास काहीच नाही अशी या मंजुळेची तडफड या कथेत चित्रित झालेली आहे. म्हणून पाण्याविना मासोळी ही सूचित जाणीव स्पष्ट करणारी कथा होय.

**नात्यानं बाप :-** १९४२ च्या क्रांती लढ्यातील एक भूमिगत स्वातंत्र्यसेनानी-केशवनाना! इंग्रजांची गोळी पायात लागूनही १० मैल पळत जाऊन निर्वाणीचा संदेश देणारा सच्चा क्रांतीकारक. डाव्या पायानं कायमचा अधू. तरीही सरकारी खजिना लुटणारा गोऱ्या साहेबाला अंगावरील कपडे उतरवून पळवून लावणारा. तिरंगी ध्वज घेऊन नाचणारा केशवनाना स्वतंत्र भारतात मात्र रडत होता. दीड पायानी चालत होता. सगळ्या जन्माचीच माती झाली होती. नानानं देशसेवा केली. बायको सरजानं मात्र नानाचं संसार उभा केला. कष्ट उपसत दोन लहान पोराना मोठं केलं. स्वातंत्र्य काळ बदलला. परिस्थिती बदलली. स्वार्थ वाढला. नाना सत्याने वाट तुडवत राहिला. त्यांचा मेळ कधी बसलाच नाही. पोरं मोठी झाली. त्याच्यासाठी काहीतरी केलं पाहिजे. पण कुणापुढे नतमस्तक व्हायचं नाही. ते नानाला कधी माहीत नव्हतं. पण तो मनात ठरवितो पोराच्यासाठी चळवळीतील मित्र काकासाहेब पाटील पुढं राजकारणात कारखान्याचं चेअरमन! त्याना भेटतो. काका नानाला मानतात. त्याच्या दोन्ही पोराना कारखान्यात नोकरी देतात. नानाचं घर उभा राहिलं. पुढं नाना सरजा आणि काकाचा विचार घेऊन दोन्ही मुलांची लग्न करतात. त्यांना कारखान्याच्या क्वार्टर्स दिल्या. दोघांचा नवा संसार फुलू लागला. कालांतरानं मुलं नानाला विचारत नाहीत. आई-वडिलांकडे लक्ष देईनासे होतात. महिन्याला शंभर शंभर रूपये पाठवायचे म्हणून पाठवतात. कालांतराने तेही बंद करतात. दिवाळीचा सण आलेला. नाना आपल्या मुलांकडे जातो. पण त्याची दखल ते दोघेही घेत नाहीत. त्याला परकेपणाची वागणूक देतात. नाना मनातून दुःखी. काका मित्राकडे दुःख व्यक्त करतो आणि सांगतो मुलांना कामावरून काढू नको. सुखानं जगू दे. काकाने ऑफिसातून १००-१०० रू. कपात करून नानाला पैसे पाठवण्याची व्यवस्था केलेली असते. तेच पैसे आल्याने सणाला सरजा म्हातारीने पोळीचा बेत केलेला असतो. नानाला आग्रह करून वाढत असते पण नानाला ते खावत नाही. तो सरजाला सांगतो की नात्यानं मी फक्त बाप ठरलो आहे. मुलांनी नानाला दिलेल्या वागणुकीने नानानं हाय खाल्लेली

आहे. एके काळी इंग्रजाना सळो की पळो करून सोडणारा नाना मुलांपुढे मात्र विदिग्न होतो. जीवनात काही अर्थ नसल्याची जाणीव त्याला बोचत राहते. असा या कथेचा आशय आहे.

**कोंडमारा :-** लेकाच्या संसारासाठी स्वत:च्या मनाचा कोंडमारा जसा व्यक्त होतो तसा मंगल अन सखाराम मुलगा होत नाही म्हणून दोघांचा चाललेला कोंडमारा याचं चित्रण येथे आले आहे. हौसाबाई वय झालं तरी मुलाच्या संसाराचा गाडा ओढत असते. राब - राब राबत असते. दोन जनावरं पाळलेली असतात. शेतीवाडी फुललेली असते. पण सखाराम आणि मंगल याना दोन मुली झालेल्या असतात. आणि आता मुलगा पाहिजे म्हणून दिवस गेल्यानंतर मंगलला दवाखान्यात नेऊन तपासून मुलगी असल्यास गर्भ खाली करायचा असं ठरलेलं असतं. त्या दिवशी हौसा रात्री विचारात पडते असं किती वेळ व्हायचं. पहिल्या दोन मुली खाली केल्या आता तिसरी वेळ. हौसा सासू विचारात पडलेली. तिच्या मनात अनेक विचारांची वादळं. ती डॉक्टरला बदलेल्या परिस्थितीला शिव्या घालते. सून सोन्यासारखी असलेली पण आता हाडाचं काडं होऊन राहिलेली. चार मुलांना जन्म देवून चिपाडागत वाळलेली. तिला सोसायचं नाही. त्यात काही कमी जास्त झालं तर ! कारण गावातील दोन घटना ती चव्हाणाची सून मेलेली असते. हौसाला नको त्या विचारानं घेरलेली असते. ती मोठ्या निर्धाराने उठते. घरात गहिवर मांडते. सखाराम मंगल तिच्याजवळ येतात. मुली उठून रडायला सुरूवात करतात. काय झालं म्हणून शेजारी गोळा होतात. हौसा सखारामला सांगते. सुनेला दवाखान्यात नेऊ नको नांहीतर मी जीव देईन. तो बरं म्हणतो. ती भिंतीवर डोके आपटून घेते. सखाराम बघत असतो. प्रस्तुत कथेत सासूचं सुनेवर असणारं प्रेम येथे दिसतेच शिवाय मुलगी नको मुलगाच पाहिजे या समाजातील प्रवृत्तीवर प्रकाश टाकत विज्ञानानं मानवावर घातलेली झडप ह्याचं दर्शन येथे घडते.

**घर आणि बंगला :-** शिवराम आणि शांतानं आपल्या भावाला दिराला आनंदाला शिकवून कॉलेजात प्राध्यापक केलेले असते. तो मोठा झालेला असतो. मुळात शिवराम आनंदाला शाळेला प्रथम पाठवायला विरोध करतो तर शांता म्हणते चांगलं शिकताती शिकू दे आणि कालांतरानं शिवराम शांता घरात शेतात राब राब राबत्याती पुढं कोल्हापूरला शिकाय पाठवतात शांता आपल्या पोराचं जेवढं लाड करत

नसते तेवढं आनंदाचे करते. त्याला घरचं जेवण डबा पहाटे उठून करून देते. शिक्षण, नोकरी होते. लग्न करून देतात. तो शहरात राहतो. बायकोही नोकरी करते. बरोबर शिकलेली बायको मिळते. तिलाही आनंदाबरोबर पगार मिळत जातो. त्यांना एक मुलं होते. ते इंग्रजी शिकत असते. शिवराम आणि शांताला दोन पोरं असतात. संपत सातवीत शिकत असतो. शांताला वाटतं आपल्या पोराला दिराने आनंदाने शहरात शिकायला घेऊन जावं. ती विचारण्यास कोल्हापूरला येते. विचारते. पण दोघेही नवराबायको गप्प होतात. बायको म्हणते. संपतच्या खेडवळ संस्कार आपल्या मुलावरही होतील. शांता काय समजायचं ते समजते. घरी परत येते. दिवस बदलतात आणि शिवराम स्वप्न रंगवतो. विहीरीवर मोटर बसवावी. आनंदाकडून पैसे आणावेत. तशात आनंदा घरी येतो. तो सांगतो. बंगला खरेदी केला. दोन लाख ऐंशीहजार कर्ज काढलं आहे. तो भावाकडे वाटणी मागतो. जमीन विकायचं बोलून दाखवतो. शिवराम आणि शांता वास्तुशांतीला मुलांना घेऊन बंगल्यात शोभेल असं डायनिंग टेबल तीन हजारं रिन काढून घेऊन जातात. आनंदा वाटणीचं बोलतो. शिवराम काही बोलत नाही. शांताच मनात म्हणते भाऊजी आता व्यवहारी झाले आहेत. ती संपतला शिकवून मोठा करायचं स्वप्न बाळगते. भाऊजी येतात. तिच्या हातात शंभरची नोट ठेवतात. संपत शाळेतून येऊन तिला रूपया मागतो. ती सांगते तू शिक मोठा होता. चुलत्यापेक्षा मोठा हो. तुला हीच नोट देते. त्याचे पेढे घे आणि काकाला नेऊन दे. तवर ही नोट मी जपून ठेवते. असा या कथेचा आशय आहे. एक जिद्दी स्त्रीची कहाणी आहे.

**ऊन – सावली :–** अनसा आणि महादेव सुखी जोडप्यांचा संसार. महादेव कारखान्यात नोकरीला. कारखान्याच्या चाळीत राहतात. दोन मुली. एक मुलगा. थोरली सुमन आठवीला तर सुरेश आणि संगीता प्राथमिक शाळेत शिकत होती. नवऱ्याच्या संसाराला हातभार लावावा म्हणून तीही महिला मंडळाच्या उद्योगसमुहात पापड लाटत होती. ती लाखगुणी असते. सर्वावर माया करत असते पण दिवस फिरतात. महादेवला दारूचं व्यसन लागतं आणि संसाराची धुळधाण होते. पगाराचे पैसे दारूसाठी खर्च होत होते. अनसा घर सांभाळत होती. अशातच सुमन तापानं आजारी. ताप वाढतो. कारखान्यातील दवाखान्यात ती मुलीला घेऊन जाते. डॉक्टर सांगतात. मिरजेला घेऊन जा. ती घरी येते. नवऱ्याची वाट पाहते. शेजारची कमला

काकू चौकशी करते. तेवढ्यात नवरा येतो. झोकांड्या खात. तिचं काळीज करपून जाते. तो जेवायला वाढ असं अनसाला म्हणतो. ती वाढते. तेवढ्यात काकू म्हणते आरं डॉक्टर सुमनला मिरजला न्या म्हणून सांगितलेले आहे. तो मरू दे. मला काय माझी दोन दिवस बिनपगारी केली आहे. काकू चांगला सल्ला देते. निघून जाते. ती जाताच तो बायकोला तांब्या फेकून मारतो. तिला तो चांगलाच लागतो. शिव्या घालत तो निघून जातो. पुन्हा दारू पिऊन तिथच पडलेला असतो. अनसा पुन्हा सुमन जवळ येते. तिच्या डोक्यावर हात ठेवते. थंडगार लागतं. संगीताला सुरेशला जवळ घेते. डोळे गाळते. पण मनात भिती असते. सुमनला हाका मारते पण ती गप्प होते. ती हे जग सोडून निघून गेलेली असते. अनसा पोराना काकूला बोलावण्यासाठी पाठवते. काकू येते. तेवढ्यात डॉक्टराना कोणीतरी बोलावण्यास सांगते. महादेवला शोधण्यास जातात. तो सापडत नाही. डॉक्टर येतात. तपासतात. नकारार्थी मान हालवतात. सुमन म्हणून अनसा हंबरडा फोडते. महादेवचा पत्ता नसतो. शेजारीच सुमनचं प्रेत अंत्यसंस्कार करायला घेऊन जातात. महादेव दारू पिऊन बेशुध्द. पहाटे गार वारा लागतो. स्वप्नात सुमन मेली आहे असा भास होतो. तो उठतो. घरी येतो. खोलीजवळ प्रेताला आंघोळ घातल्याची खूण. म्हणजे माझी सुमन... तो हुंदका देवून उंबरठ्यावर कोसळतो. दारूच्या नशेत आपल्या मुलांची संसाराची धुळधाळ करणाऱ्या महादेवचे प्रभावी चित्रण येथे आले आहे.

**इगत :-** शंकर नाना आणि तात्या टोपकर हे जीवाभावाचे दोस्त. बारश्यापासून सुतकापर्यंत त्यांनी एकमेकाना अंतर दिलं नव्हतं. शंकर नानाचं वडील आबा चार वर्ष झाली तरी तलाठी वारसा हक्काची नोंद घालत नाही. चावडीत हेलपाटे गेली चार वर्ष नाना घालत असतो. मेटाकुटीला आलेला नाना संसारात सगळं असूनसुध्दा अनेक अडचणींना तोंड द्यावं लागतं. तलाठ्याला नानाने सगळी पूर्तता केलेली. मृत्यूचा दाखला, चारशे रूपये दिलेले पण तलाठ्यानं चालढकल चालवलेली. नाना तात्याला सर्व सांगतो आणि म्हणतो तूच इगत काढ बाबा. त्यावर तात्या नानाला इगत सांगतो. त्याप्रमाणे दोन मोठे विंचू चावडीत नेवून सोडतो. चावडीत त्या दिवशी तलाठी आणि सर्कल दप्तर तपासणी चाललेली. नाना गेला. बसला. पानं दोघानाही दिली. नोंदीचं बोलले तर काय गडबड हाय बघू नंतर. नाना विंचू तलाठ्याजवळ एक. सर्कलजवळ एक. अशा बेतानं काड्याच्या पेटीतून सोडलेलं. भर दुपारी बाराचं ऊन. त्यात

तलाठ्याला विंचू चावला अन सर्कललाही चावला. दोघांच्या अंगाची लाही लाही. सर्व गाव चावडीवर जमतं. नाना लपून बसलेला कारण गावात फक्त नानाच विंचू उतरायचं औषध देत होता. तलाठी शिपायाला सांगतो. नानाला बोलाव. शिपाई नानाच्या घरी येतो. नानाची बायको गावाला गेल्याती म्हणून सांगते. तात्या चावडीवर येऊन उतारा म्हणून चटणी खायला लावतो. विंचवाच्या मुंग्या. त्यात तोंडाची होरपळ. नानाची बायको उतरंडीचा गांजा देते. तेही तलाठी सर्कल उतारा म्हणून खातात. त्यानं जास्त विंचू चढतो. दोघांची अंगाची लाहीलाही होते. दिवस कललेला असतो. नाना माळ्यावरनं उतरतो. तेवढ्यात त्याला सांगावा येतो. तलाठी बोलवतो आहे. नाना निवांतपणे चावडीत येतो. तर तलाठी सर्कल विनवण्या करतात. तेवढा नाना उतारा दे बाबा. तेव्हा नाना नोंदीची आठवण करून देतो. आता उतारा देतो. दुसऱ्या दिवशी तलाठी नानाची वारसाची नोंद घालून घरी उतारा घेऊन आलेला असतो. अशी ग्रामीण भागातील माणसं इगत करून आपलं काम करून घेतात याचं चित्रण या कथेत आलेले आहे.

**'महापूर' कथा संग्रहातील आशयाची समृध्दता आणि विशेष –**

'महापूर' मधील कथा आशयदृष्ट्या समृध्द आहेत. या सर्व कथांचा मध्यवर्ती केंद्रबिंदू माणूस असून त्या माणसांच्या विविध तऱ्हा स्त्री-पुरूष त्यांच्या व्यथा, वेदना आणि त्यांची जगण्याची पारंपारिक मूल्य व नवतेचा आघात, त्यात जाणवणारी फारकता असा विविध जाणीवाचा आलेख खोत यांनी यातून स्पष्ट केला आहे. शिवाय ग्रामीण माणूस माणुसकी जपतो आहे. पण परिस्थितीच्या रेट्यात त्याला माणुसकीला मुकावे लागते आहे की काय हा प्रश्न त्याच्या कथा वाचताना होतो. माणुसकी शून्य आजच्या व्यवहारांत जगण्याची ओढाताण होताना ग्रामीण माणूस हतबल होतो आहे. त्याचे जीवघेणे दु:ख तो सोसत आहे आणि बदलत्या काळात आपणही बदलले पाहिजे याचे सूचन त्यांची कथा करून देत आहे.

**विषय वैविध्य** - लेखक खोत विषय वैविध्य जाणीवपूर्वक हाताळले आहे. 'लेकावळा' या कथेत लग्नाशिवाय संसार करून मुलं झाल्यानंतर त्यांची कालांतराने लग्न करताना येणाऱ्या अडचणी, समाजात खेड्यात अजूनही जातीचा असून जातीबाहेर कसा ठेवला जातो हा विषय लेखकाने जाणीवपूर्वक हाताळला आहे. 'परवड' दुष्काळावरची असणारी ही कथा अत्यंत चित्तथरारक अनुभव स्पष्ट करत

जाते. मजुरी करणाऱ्या पती पत्नीला आपल्या मुलीला चिमीला अखेर कसे मुकावे लागते याची हृदयद्रावक कहाणी येथे सांगितली आहे. 'जोसरा' याही कथेत लेखकाने बायकोसाठी 'जोसरा' काढणारा आणि तिच्यासाठी अखेर वेडा होणाऱ्या उमद्या भीमाची करूण व्यथा व्यक्त केली आहे. आशयातील महत्वपूर्ण वैशिष्ठ्य असलेल्या या कथा आहेत. 'पाटाचं पाणी, नात्यानं बाप, कोंडमारा' या कथातून प्रस्थापित व्यवस्थेला सामोरे जाताना अंत:करणातून पूर्णपणे उन्मळून पडलेल्या जीवाची वेदना लेखकाने प्रकट केली आहे. 'कोंडमारा'मधील हौसा आपल्या सुनेच्या काळजीनं तिच्या मनाची होणारी घालमेल यासाठी तिने केलेला आकांत. मनाला चटका देवून जातो. तर नात्यानं बाप मधील केशवनाना आपल्या मुलांनीच आपल्याला विचारलं नाही. एक वाटसरूसारखी वागणूक दिल्याने नाना मनातून झुरणी लागतो व जन्म दिला म्हणून महिन्याला शंभर रूपये मुलं देतात याचं नानाला अंतरिक दु:ख, वेदना सलत राहते.

**कौटुंबिक ताणतणावाचे चित्रण :-**

खेड्यातील कौटुंबिक जीवनाचे चित्रण नेमकेपणाने लेखकाने महापूर या कथासंग्रहात चित्रित केले आहे. 'अदावत', 'वाटणी ', 'पाटाचं पाणी' , 'घर आणि बंगला', 'कोंडमारा' इ. कथांतून कौटुंबिक जीवनात निर्माण झालेल्या ताणतणावाचे त्या कुटुंबाच्या स्थिती गतीचे वास्तव दर्शन लेखकाने मोठ्या सामर्थ्यानिशी रेखाटले आहे. 'अदावत' या कथेत एकत्रित कुटुंबात एखाद्या गोष्टीवरून किती ताण-तणाव मिर्माण होतो. त्यातून घरातील प्रत्येकाला कसे हतबल व्हावे लागते याचे चित्रण केले आहे. धुर्पा आणि म्हातारा त्याची तीन मुलं, तीन सुना, मुलंबाळं, नातवंड असा मोंठा संसाराचा डोलारा धुर्पानं अजून त्यावर हुकमत ठेवली होती. एक दिवस म्हातारीचा पैशाचा बटवा थोरला मुलगा शिवराम म्हैस खरेदीसाठी घेऊन जातो. परंतु म्हातारीला न सांगताच घेऊन गेल्याने म्हातारी दिंवसभर झुरणीला लागते. प्रत्येकावर संशय घेते. म्हातारा, सुना, नातवंडे आलेली पाहुनी या सर्वावर अदावत घेतली जाते. दिवसभर कोणीही जेवण घेतलेले नसते. परंतु सायंकाळी म्हैस घेऊन शिवराम येताच हे सर्व कोडे सुटते. 'वाटणी ' या कथेत आयुष्याच्या अखेरीला माणसांची होणारी परवड लेखकाने येथे दाखवली आहे. लिंबाजी आणि भागू या म्हातारा- म्हातारीची आयुष्याच्या अखेरची वाटणी होते. दोन भावाच्या वाटणीत म्हातारा लिंबाजी हा

थोरल्याकडे भीमरावाकडे वाटून येतो तर धाकट्याकडे म्हातारी असते. भीमरावाला सोपान आणि जयसिंग अशी दोन मुलं ती शाळा शिकत असतात. म्हातारा मळ्यात वस्तीला असतो. धाकट्याची लहान लहान मुलं म्हातारी सांभाळत असे. म्हातारी दिवस ढकलत असते. म्हातारा मळ्यात दुचांगती होऊन असतो. एक दिवस म्हातारी फडक्यात दोन भाकरी खर्डा दही आणते. मळ्यात म्हाताऱ्याला खायला घलते. म्हातारा जीर्ण झालेला असतो. पण म्हातारी त्याला सांगत असते. तुम्हाला चैन कसा पडतो. म्हातारी म्हणते, हातातला बाण सोडलासा आता दोरी तुटली. आपली हाडाचं काडं करून रातध्याड मळ्यात राबून ह्यास्नी लहानाचं मोठं करून हीच आपली दशा करताना आपला हिंस्सा बाजूला काढला पाहिजे होता. दुसऱ्याचं बोलणं खात डोळ्याच्या पाण्याभर भाकरी खावी लागते.[१] म्हातारा तिला समजावतो. पिकलं पान गळून पडलं काय किंवा कुणी तोडलं काय सारखंच तशी म्हातारी रडते. अशा रितीने एक कुटुंबात भावा-भावाच्या वाटणीत जन्मदात्या आईवडीलांची होणारी वाटणी आणि त्यातून म्हातारा-म्हातारीची जीवघेणी ओढाताण लेखकाने येथे चित्रित केली आहे.

'पाटाचं पाणी' या कथेत तात्या देसाई याच्या संसाराची वेगळीच कहाणी येथे व्यक्त झाली आहे. तात्याने दोन लग्नं केली. पण तात्याने एकट्यानेच संसार केला पहिली मेली. दुसरी केली ती गिरजा. चैनखोरी उधळी रहिमानचा हात धरून निघून गेली. तिला मुलगी होते. मुलीसाठी पुन्हा तात्या देसाई यांचेकडे येते. तात्या दोघींचा स्वीकार करतो. तो केवळ मुलीसाठी स्वीकार करतो. 'घर आणि बंगला' या कथेत दोन भावांची कहाणी सांगितली आहे. शिवराम आणि आनंदा हे दोघे भाऊ. शिवरामची पत्नी शांता. आई-वडिलांच्या माघारी शिवराम शांताने आनंदाला खूप शिकवलं. कॉलेजात प्राध्यापक केलेले असते. त्याचे लग्न थाटात केले असते. त्याची पत्नीही कॉलेजमध्येच असते. दोघांचा पगार परंतु ते आपल्या घराला विसरतात. शहरात राहतात. बंगला विकत घेतात. पण शांता आणि शिवरामच्या आयुष्य कष्टाशिवाय त्यांना दुसरं सुखच नाही अशी अवस्था. अखेर आनंदा वाटणी मागतो. तो जमीन विकायचा विषय बोलतो तेव्हा शिवराम आणि शांता मनातून पूर्णपणे दुःखी होतात असा हा कौटुंबिक पातळीवरचा आशय चित्रित करण्यात आला आहे. 'कोंडमारा' या कथेत हौसाने नवऱ्याच्या माघारी मुलाचा संसार फुलवलेला आहे. तिचे सुनेवर खूपच प्रेम आहे. सुनेच्या गर्भपाताला तिचा प्रचंड विरोध आहे. त्यासाठी ती आपल्या

लेकाला वारंवार बजावते. पण मुलगा ऐकण्याच्या मन:स्थितीत नसल्याने तिच्या मनाचा कोंडमारा होतो. त्यातूनच ती आकांत मांडते. कुटुंबात घडणाऱ्या घटना आणि एकमेकाविषयी प्रेम, जिव्हाळा यात प्रकट झाला आहे.

कौटुंबिक ताण तणावांच्या चित्रणाबरोबर त्या कुटुंबातील भाऊबंदकीचे चित्रण प्रभावीपणे आलेले आहे असे दिसते. उदा. आनंदा आणि शिवराम या भावा-भावामधील विचाराची फारकत स्पष्ट दिसते. शिवराम काहीसा अडाणी, अज्ञान तर आनंदा शिकलेला सज्ञान. नव्या विचाराने भारलेला. तो परंपरेला खेड्याला नाकारतो आहे. तर आपली परंपरा पुन्हा मोठ्या जिद्दीने चालवायची असा निर्धार शांता आणि शिवराम करतात. वाटणीमध्ये भावा-भावानी आई-वडिलांची जगाच्या लोजखातर सोयीने वाटणी करून घेतली आहे आणि त्याची म्हातारपणी परवड केली आहे.

**दु:ख दारिद्रयाचे चित्रण :–** ग्रामीण जीवनातील जीवघेणं दु:ख, दारिद्रय याचं चित्रण महापूरमध्ये प्रभावीपणे आलेले आहे. त्या दृष्टीने परवड ही कथा उल्लेखनीय आहे. दुष्काळी परिस्थितीत खेड्यातील गरीब कुटुंबे स्त्री - पुरूष मिळून रोजगार करण्यासाठी दुष्काळी कामावर जात असतात. त्यातील रामा आणि सीता या दरिद्री कुटुंबाची जीवघेणी व्यथा यातून अधिकच उठून दिसते. दोन घासही एकवेळ खायला मिळू नयेत. लहान मुलानी भाकरी- भाकरी म्हणून रामाच्या व सीताच्या मागे किटकीट करावी आणि त्या मुलांची कशीतरी समजूत घालावी. त्यात चिमी या लहान मुलीला कामावरचा टिकाव लागतो. तिला दवाखान्यात नेण्यासाठी एक पैसा नसतो. दारिद्रयानेच चिमीचा अखेर बळी घेतला गेल्याचे येथे सूचकपणे लेखकाने सूचित केले आहे. 'तोडगां' या कथेतही विधवा हौसा आपल्या दरिद्री परिस्थितीतही मुलीला सुखी जीवन लाभावे म्हणून राब राब राबून जीवाचं रान करून तिचे चांगल्या घराण्यात लग्न करून देते. पण तेही तिच्या नशीबी नसते. फुलला भरला संसार सोडून अखेर आईकडेच येऊन राहावे लागते. कारण नवरा दारूडा, सासूचा, जावाचा जाच यामुळे ती सासर सोडते. दरिद्री गरीब हौसा काहीच करू शकत नाही. 'ऐपत' या कथेत कमळा या दारिद्रयात जीवन कंठणाऱ्या स्त्रीला संपत आणि सुला दोन मुलं. सुलाचे लग्न ती चांगल्या भरल्या घरात करून देते. गावातच तिला पवाराच्या घराण्यात दिलेली असते. सुलीला सुख लाभावं यासाठी सासरच्या मंडळीचं ती खूप आयाससायास करते. ती स्वत: कर्जात जाते पण मुलाला काहीही कमी पडू

देत नाही. त्यासाठी ती आपली घरची शेळी, कोकरू विकते. जमिनीवर पैसे काढते. मुलीला सासरी पाठवणीला बरोबरीं करून पाठवते. अशी दरिद्री स्त्री कुटुंबाचे चित्रण येथे आले आहे.

**संघर्षमय जीवनाचे चित्रण :–** संघर्षमय जीवनाचे चित्रण 'महापूर' या कथासंग्रहात जाणीवपूर्वक अभिव्यक्त झाल्याचे दिसते. कौटुंबिक पातळीवरचा असणारा संघर्ष काहीवेळा व्यक्ती व्यक्तीच्या विचारामध्ये फारकत होऊन वेगळे रूप धारण करतो. 'तोडगा' मधील फुला व तिची सासू यांच्यात कुटुंब पातळीवर जगताना सासूला फुला सनू म्हणून नको असते तिला आपल्या भावाची मुलगी सून म्हणून हवी असते. म्हणून ती फुलाचा जाच करते आणि मुलाचा फुलावर जीव जडलेला यामुळे कुटुंबात वादळ निर्माण होते. कुटुंबाची वाताहत होते. सुप्त संघर्षाचे जीवन यात चित्रित झालेले आहे. वाटणीमधील लिंबाजी भागू त्याची दोन मुलं याच्यातील जीवन कलह लेखक खोत यांनी नेमकेपणाने टिपला आहे. जीवन म्हणजे झुंज आहे आणि ते झुंजतच जगले पाहिजे अशी वृत्ती मानून 'महापूर' या कथासंग्रहातील बहुतेक करून स्त्री-पुरूष जीवन जगताना आढळतात. जीवन संघर्ष हा खोताच्या कथेचा पिंड आहे. जगताना व्यक्तीला करावा लागणारा जीवघेणा संघर्ष हा मोठा विदारक आहे. पोटासाठी दोन घासासाठी दिवसभर मुरूम खोदणारे रामा आणि सीता यांची परवड येथे स्पष्ट होतेच आपला आणि बायकोचा एकत्र येणं केवळ आईमुळे शक्य होत नाही म्हणून वेडापिसा होणारा भीमा संसारासाठी भरल्या घरातून रस्त्यावर येतो. वडिलोपार्जित जमीन, घर आपल्या नावावर होत नाही. संसारात कशाचीच प्रगती करता येत नाही म्हणून शंकरनानाला चार वर्षे वाट पहावी लागते. अखेर इगत करून तलाठ्याला धडा शिकवूनच जमीन नावावर करून घेतो. व्यसनी नवऱ्याबरोबर अनासा जिद्दीने संसार करते पण मुलीच्या आजारपणाला तिच्या औषध पाण्याला पैसे मिळत नाहीत. अखेर मुलीला तिला गमवावे लागते. ' नात्यानं बाप'मधील केशव नानाने स्वातंत्र्य चळवळीत आयुष्य झोकून देवूनही बायकोनं घर सांभाळले आणि आयुष्याच्या अखेरीला मुलांनी त्याला भिकाऱ्याची वागणूक दिल्याने आणि महिन्याला शंभर रूपये केवळ बाप म्हणून, जन्मदाता म्हणून देवू केल्याने उन्मळून पडलेला नाना आयुष्यभर जीवन संघर्ष करत राहतो. 'पाण्याविना मासोळी ' लग्नाशिवाय बालमित्र माधवबरोबर मैत्री करते. मुलाला जन्म देते आणि अखेरपर्यंत त्या आठवणीवर ती

जगत राहते. अशा या कितीतरी व्यक्ती या जीवन कलहात आपले अस्तित्व जपण्यासाठी धडपडताना दिसतात. या दृष्टीने तोडगा, ऐपत, महापूर इ. कथा पाहण्यासारख्या आहेत. मुक्या प्राण्यावर प्रेम करणारा संपत आपल्या घराच्या शेळीवर व कोकरावर जीवापाड प्रेम करतो. बहिणीच्या पाठवणीसाठी शेळी कोकरं विकली जातात तेव्हा तो रडतो. अखेर भाऊजींना बाजारात एकतरी कोकरू घेऊन द्या कपडे नकोत असे सांगतो. आपल्या मातीवर प्रेम करणारा शिवराम व शांता जमीन विकायची या विचाराने दृढमूल होतात.

ग्रामीण समकालीन अंध:श्रध्देचे देवदासीचे जागतिणीचे चित्रण ही अदावत या कथेत आलेले आहे. आकणी जोगतिण तिचं देव अंगात येणं याचे दर्शन यात येते. त्यातील फोलपणा सूचकपणे स्पष्ट केला आहे.

ग्रामीण परिसरातील निगर्साची विविध रूपं महापूरमध्ये चित्रित झाली आहेत. निसर्ग आणि माणूस यांचं अतूट नातं आहे. निसर्गानं मानवाला जगण्यासाठी नेहमीच साह्य केले आहे तर काही वेळी त्यांच्या जीवनामध्ये तांडव निर्माण केले आहे. निसर्गाने ग्रामीण माणसाला हतबल करताना जी विविध रूपे धारण केली त्याचे यथार्थ चित्रण खोत यांच्या लेखनशैलीने अचूकपणे टिपले आहे. महापूर या कथेत पावसाचं वर्णन करताना लेखक लिहितो - रात्रं दिवस पाऊस कोसळू लागला. आभाळ ढगाचं घोंगडं पांघरून बसलं होतं. ढगफुटी व्हावी तसा पाऊस सुपानं ओतत होता. गवर घुमल्यासारखा घुमत होता. परि अंगात आल्यासारखा नाचत होता. घराच्या वळचणीत पाणी मावत नव्हतं. घरात पाणी दारात पाणी उभ्या शिवारात पाणी सगळीकडं पाणीच पाणी. नदी, नालं दुथडी भरून वाहू लागलं. नद्या-नाल्यांना महापूर आला. २ याच पावसाचा मानवी जीवनावर परिणाम - कोण कोणाला आपल्या वळचणीला उभं राहू देईना. जाणती माणसं मुंडी, घोणेत तोंड घालून दिवस ढकलत होती. तर लहान पोरं भाकरीसाठी लचकं तोडत होती.'

दुष्काळाच्या स्थितीचे 'परवड' मध्ये आलेले वर्णन ही परिणामकारक आहे. 'दुष्काळ पडला आणि हे गाव आगीत फुटाणा भाजावं तसं भाजून गेलं. दुष्काळानं करपून गेलं. त्याला कसली ती रया राहिली नाही. माणसांच्या पोटापाण्याची पंचायत पडली. गुरं-ढोरं चिपाड झाली. उभं गाव पाण्याला महाग झालं. माणसाला जगावं कसं हेच कोडं पडलं. पाण्यासाठी माणसं दाही दिशा हिंडायला लागली.३ असा

चित्रणात निसर्गापुढे माणूस हतबल होताना दिसतो आहे. तो त्याही परिस्थितीत जगण्यासाठी धडपडत राहतो.

बदलत्या काळाला आणि परिस्थितीला, संकटांना मोठ्या धैर्याने सामोरी जाणारी माणसे हा लेखक खोत यांच्या कथेचा मानबिंदू होय. 'पाटाचं पाणी' मधील तात्या देसाई वादळ वाऱ्यात वाळवाच्या पावसात वडाच्या झाडानं सगळं सोसावं तसं तात्यानं सोसलं. आता पन्नाशी गाठली. आता बायको असली काय अन् नसली काय सारखीच की ! घटकाभरानं तात्या शांत झाला. आणि स्वत:शीच म्हणाला खरं त्या पोरीची काय चूक ? ती बिचारी कुणा कसायाच्या गळ्यात कशी बांधायची ? मग मीच तिचा बाप झालो पाहिजे. त्याशिवाय सुटका नाही त्या पोरीची ! यातून बदलत्या परिस्थितीला तात्या सामोरे गेल्याचे दिसते व सोळा वर्षे बाहेर मुलीसह राहणाऱ्या बायकोला घराचा आसरा देतो. 'वाटणी'मधील लिंबाजी भागू आयुष्याच्या अखेरला दोन मुलामध्ये वाटून जातात आणि त्याची दोघांची परवड होते. म्हातारा म्हातारीला म्हणतो, 'अंग आता किती दिवस राहिलं आपलं ? कशाला कुणाला बोलायचं पिकलं पान गळून पडलं काय आणि कुणी तोडलं काय सारखंच की !' तरी ती दोघे परिस्थितीवर मात करत दिवस ढकलत होती. बदलत्या काळात मुलगा बायकोची गर्भ तपासणी करायला विरोध करणारी हौसा शिकलेल्या भावाला कर्ज काढून डायनिंग टेबल देणारा भाऊ शिवराम अशा व्यक्ती. या महापूर कथासंग्रहात आल्या आहेत. महापूर कथा संग्रहातील सर्वच कथा वाचल्यानंतर आशयदृष्ट्या त्या परिपूर्ण वाटतात अन् डोळ्यापुढे एक बदलत्या ग्रामीण जीवनातील गाव उभं राहतं आणि सर्वच कथा तेथे घडल्या आहेत अणी मनोभावना तयार होते. शिवाय ग्रामीण जीवनाचं वास्तव हृदयस्पर्शी कारुण्य, दु:ख याचं चित्रण करणाऱ्या कथा यात जणू एकवटल्या आहेत. त्यातील भाऊबंदकी बदलत्या मानसिक वृत्ती - प्रवृत्ती याचं दिग्दर्शन येथे घडते आहे. एकूण आशयाभिमुख असलेली त्यांची कथा ग्रामीण जीवन ग्राम संस्कृती तेथील समाज विघातक प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्याचे काम नेमकेपणाने करते आहे.

**अभिव्यक्तीच्या अंगाने महापूरचे विशेष :-**

लेखक आप्पासाहेब खोत यांचा " महापूर " हा कथासंग्रह आशयाने समृध्द आहे. विषयाचे वैविध्य हे याचे खास वैशिष्ठ्य आहे. विषय आणि आशय प्रभावी असून चालत नाही तर कथा यशस्वी होण्यासाठी विषय आणि आशयाबरोबर



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

अभिव्यक्ती ही तितकीच प्रभावी असावी लागते. साध्या विषयात मोठा आशय संपन्न करण्याचे सामर्थ्य लेखक खोत यांच्या लेखनशैलीत आहे. तथापि तोच आशय वाचकापर्यंत पोहोचवण्याचे सामर्थ्यही त्यांना लाभलेले आहे. शिवाय लेखक म्हणून ज्या त्या लेखकाचे लेखनाचे खास विशेष असतात. आप्पासाहेब खोत ग्रामीण कथा लेखक म्हणून आज लिहित आहेत त्या लेखनाचे अभिव्यक्तीचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे संवादमय शैली. हा होय. मराठी ग्रामीण कथेत अभावाने आढळलेली अशी संपूर्ण कथा त्यांनी संवादातून साकार केली आहे. त्यांच्या कथेचे कथानक वातावरण निर्मिती व्यक्तीचित्रण निवेदन शैली, भाषा शैली यांने परिपूर्ण असलेल्या कथा महापूर संग्रहात आढळतात.

**कथानक :-** कथानक ही व्यापक कल्पना असून कथात्मकता हा कथानकाचा प्राण आहे. लेखकाचा जीवनविषयक कलात्मक दृष्टिकोनानुसार कथात्मकतेचे स्वरूप नक्की होते. व्यक्ती, घटना, प्रसंग व निवेदन या सर्व घटकांनी मिळून कथानक तयार होते. कथेचे विषय असंख्य असू शकतात. कोणत्याही विषयाचे कथेला वावडे नाही. एखादी नाट्यपूर्ण घटना एखादे व्यक्तीचित्र, एखादा जीवनानुभव, एखाद्याची विशिष्ट प्रसंगातली मन:स्थिती ही कथेचा विषय होऊ शकते. त्यामुळे घटना, प्रसंग किंवा स्वभावदर्शन हा कथानकाचा आधार असतो. ४

आप्पासाहेब खोत यांची कथा ही व्यक्तिप्रधान स्वरूपाची कथा आहे. कौटुंबिक पातळीवरील ताण्याबाण्यातून साकार होत जाणारे व्यक्तीचे जीवन अनेक आघाताने उन्मळून जाते. रोजच्या जीवनातील कटकटी प्रचंड दारिद्रय शिवाय विचारातील फारकता जे हवं आहे ते मिळत नाही. यासाठीची धडपड इ. अंगाने खोत यांची कथा आकाराला येते. शिवाय महापूरमधील कथा वर्तमानात घडत आहेत. वर्तमानाचा संदर्भ घेऊन साध्या घटना प्रसंगातून मोठा आशय निर्माण करून एकच एक तत्व प्रतिबिंबीत करणं हा लेखकाचा हेतू कथा लेखनामागे दिसतो. त्या दृष्टीने कथानकाची रचना जाणीवपूर्वक केलेली आहे असे कथा वाचताना जाणवते. अदावत एका दिवसात घडणारी घटना म्हातारीचा पैशाचा बटवा जातो. ती प्रत्येकावर अदावत घेते. अंधश्रध्देच्या आहारी जाऊन जोग जोगतिण आणते. बटवा मुलाने नेल्याचे समजताच म्हातारी मनातून उन्मळून पडते. असे कथानक त्यातून आजही ग्रामीण खेड्यात एकत्र कुटुंबात संशय आणि त्यातीन अंधश्रध्दा कशी असते यावर भाष्य केले आहे.

वाटलेल्या म्हातारा-म्हातारी एकत्र येऊन जेवतात. मुलगा पाहतो. पुन्हा त्यांची ताटातूट करतो. 'वाटणी'चे कथानक. दुष्काळ स्थितीत रामा आणि सीता यांची जीवघेणी परवड. त्यातून चिमीसारख्या मुलीला मुकावं लागतं. याचं दर्शन घडविले आहेच पण प्रस्थापित व्यवस्थेतील डॉक्टर, मुकादम या शासकीय व्यक्ती प्रवृत्तीवर भाष्य केले आहे. विषय साधा आशय मोठा हे तंत्र महापूरमध्ये सांभाळून त्या अनुरोधाने व्यक्ती, घटना, प्रसंग वातावरण निर्मिती निवेदन शैली भाषेचा बाज इत्यादीतून त्यांची कथा वाचकावर परिणाम करते. 'इगत' जमिनीची नोंद या विषयाच्या अनुरोधाने शंकर नाना व तात्या यांनी केलेली इगत तलाठी सर्कल चावडी या पार्श्वभूमीवर ग्रामीण माणसाच्या रांगडेपणा आणि त्याच्या ठिकाणी इगतीतून हे कथानक पुढे जाते आहे असे वाटते.

'महापूर' कथेचा समर प्रसंग हा कथानकाचा प्राण आहे. भावाकडून माहेराहून भर पावसात माघारी येताना हिरा मुलासह ओढ्यातून वाहून जाते. याचे समर्पक शैलीत हृदयद्रावक कारूण्य लेखकने येथे उभे केले आहे. सासू हौसाच्या मन:स्थिती मुलगा सुनेला गर्भधारणा तपासायला दवाखान्यात घेऊन जातोय. अशा प्रसंगी तिच्या मनाचा होणारा कोंडमारा हे 'कोंडमारा' कथेचे कथानक आहे. दु:ख, दैन्य, दारिद्रय, भाऊबंदकी, मानवी नात्यातील फोलपणा हे कथाविषय लेखकाने हाताळले असून ते योग्य व्यक्तीच्या - पात्राच्या प्रसंगाच्या आधाराने त्या त्या कथेतील कथानकाला मूर्तरूप दिले आहे. शिवाय वर्तमानकाळाचे व तत्संबंधी कार्यकारण भावाचे तत्व सांभाळूनच ही कथा प्रकट झाल्याने ती वाचाविंशी वाटते.

**व्यक्तिचित्रण : –** आप्पासाहेब खोत यांची कथा ही व्यक्तिप्रधान कथा आहे. ग्रामीण जीवनातील माणसांच्या विविध वृत्ती-प्रकृती चित्रित करणं हा त्यांच्या कथेचा खास पिंड आहे. त्या त्या व्यक्ती उभ्या करण्याचं सामर्थ्य त्यांच्या लेखनशैलीत आहे. स्थल कालानेच व्यक्ती या बदलत असतात. आपल्या मनाला समजूत घालतात. परिस्थितीशी जुळवून घेतात. ग्रामीण जीवनातील स्त्री-पुरूषांच्या भावजीवनाचे अनेक कंगोरे लेखक खोत यांनी येथे टिपले आहेत. त्यांच्या "महापूर" कथासंग्रहातील जास्तीत जास्त कथा स्त्रीप्रधान नायिकाप्रधान आहेत. त्या नायिका आपल्या घराचं घरपण आणि आपली पत जपताना आढळतात. 'महापूर'मधील हिरा, 'ऐपत' मधील कमळा, 'उनसावली 'मधील अनसा, 'घर बंगला' मधील शांता, 'वाटणी'मधील भागू,

'परवड' मधील सीता या सर्व नायिका हाडाची काडं आणि रक्ताचं पाणी करून संसार उभा करताना दिसतात.[५] त्यांच्या कथेतील व्यक्तीरेखा ह्या प्रस्थापित व्यवस्थेत हतबल न होता त्याला सामोरे जाणेच पसंत करतात. 'इगत'मधील शंकर नाना तात्याच्या मदतीने तलाठी आणि सर्कलला इगतं दाखवूनच आपल्या जमिनीची नोंद घालून घेतो. तो भ्रष्ट व्यवस्थेला शंकर नाना मोठ्या युक्तीने सामोरे गेल्याचे दिसते. 'तोडगा' मधील फुला नवऱ्याला व सासूला मारहाण करून लग्नातील सर्व वस्तू घेवून आईच्या घरी राहायला येते. 'लेकावळा'मधील परिस्थितीनुसार स्त्री कठोर बनू शकते याचं उत्तम उदाहरण म्हणजे फुला. सखाराम तात्या बदलत्या विचाराचा रूढी परंपरेच वारं प्यालेला आहे. तो आपली मुलगी लेकावळा असलेल्या गणपतला देण्याचे ठरवतो. ऐपत नसतानाही आपल्या मुलीला काही कमी पडू नये यासाठी वाटेल तो त्याग करण्याची तयारी असलेली कमळा मुलीला जावाभावात कमीपणा नको म्हणून तिची पाठवणी जोरात करते. रिन काढते. ग्रामीण जीवनाचं प्रत्ययकारी दुःख घेऊन जगत असलेली माणसे दारिद्र्यात उपासमार, भुकेकंगाल अवस्थेतील मानसिक स्थिती यांचे बिंब प्रतिबिंब रामा आणि सीता याच्या मानसिक स्थितीतून लेखकाने शब्दबध्द केले आहे. खेड्यातील सासूचा वरचष्मा तिचा जाच. याच वर्णन अदावतमध्ये येते. पैसे गेल्याचं समजल्यावर शोधण्यासाठी जोगतिणीला बोलावणे पाहुणीवर संशय घेणे हे मनुष्यस्वभाव अदावतमध्ये सूचित झाले आहेत. ग्रामीण भागात लावालावी करून लग्न मोडणारी माणसे आणि त्याचबरोबर मला माणसासारखी वागणारी माणसं पाहिजेत म्हणणारा समजुतदार तात्या लेकरवळामध्ये भेटतो. दुःख उराशी घेवून आयुष्याची वाटचाल करणारी माणसे लेखक खोत यांच्या लेखनाचा विषय झाली आहेत. त्याचे दुःख हे माणसांनी निर्माण केलेले दुःख आहे तर काही नैसर्गिकरित्या ते निर्माण झाले. वाटणीमधील लिंबाजी व भागू पोटाच्या मुलांनीच त्यांची वाटणी करून ताटातुट केली. म्हातारपणी ते एकमेकांना आधार देवू शकत नाहीत याचं दुःख लिंबाजीला व भागू या दोघांनाही आहे तर ऐपतमधील कमळाचे दुःख हे तिचे तिने निर्माण करून ठेवले आहे. ती लोकापवादाला बळी पडली आहे. तर तोडगामधील हौसाची व फुलाचे दुःख हे संबंधित जावयाने व सासूने निर्माण केलेले दुःख आहे. महापूरमधील हिराचे दुःख निसर्गाने पावसाने कोप केल्याने तिला व तिच्या मुलांना दोन घासही मिळू शकत नाही म्हणून ती भावाकडे जाते. पण तेथेही तिचा स्वाभिमान

दुखावल्या कारणाने ती परत फिरते व अखेर तिचा पाण्यात वाहून जाऊन मृत्यू होतो. 'नात्यानं बाप' मधील केशवनाना मुलांनी वाईट वागणूक दिली याचे दु:ख आहे. मुलगा ऐकत नाही म्हणून हौसाच्या मनाचा कोंडमारा सूचित झालेला आहे 'कोंडमारा!' हाडाचं कांड रक्ताचं पाणी .करून स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन भावाला दिराला शिवराम व शांता यांनी शिकवले. प्राध्यापक केले परंतु तो त्यांना विसरतो. व्यवहारी होतो. जमीन विकायची सुचवतो त्यामुळे ते दोघेही दु:खी होतात. बदलाचा काळाबरोबर आणि परिस्थितीनुरूप माणसे बदलत जातात. याचे प्रतिबिंब महापूरमधील अनेक कथांच्यामधून उमटलेली आहेत. 'घर आणि बंगला' 'नात्यानं बाप', 'पाटाचं पाणी', 'तोडगा', इ. कथा पाहण्यासारख्या आहेतं. यातील व्यक्ती वेळ येईल तशी बदलतात आणि जीवनाला सामोरी जातात. लेखक त्याचे बाह्य वर्णन करतो आहे.

**वातावरण निर्मिती :-** आप्पासाहेब खोत यांच्या कथाविश्वाचा आविष्कार ग्रामीण जीवन त्या जीवनाची स्थिती गती अभिव्यक्त करणे हा खोत यांच्या लेखनाचा गुणधर्म आहे. खेड्यातील माणसांना साहित्यात स्थान देणं हा त्यांच्या लेखनाचा स्वभावधर्म आहे. म्हणून त्यांची कथा ग्रामीण परिसरात खेड्यात घडत आहे असे वाटते. सर्वच कथा वाचल्यानंतर डोळ्यापुढे एक बदलत्या ग्रामीण जीवनातील गाव उभं राहतं आणि सर्वच कथा तेथे घडल्या आहेत अशी मनोभावना तयार होते. व्यक्ती आणि घटना प्रसंग एखाद्या स्थलकालाच्या चौकटीतच घडत असतात. 'महापूर' कथासंग्रहातील सर्वच कथातील व्यक्ती आणि घटना प्रसंग हे खेड्यात घडत आहेत. त्याला सामाजिक विशिष्ट प्रकारचा स्तर आहे. शिवाय त्या कौटुंबिक पातळीवर व्यक्ती वावरत आहेत. त्याला परिस्थितीचे व काळाचे आघात सहन करत करत जीवन कंठावे लागत आहे. हे जीवन जगताना त्यांच्या व्यथा, गाथा मानसिक ताण्याबाण्यास लेखक शब्दबध्द करतो आहे. ही कौटुंबिक पार्श्वभूमी हे वातावरण या कथांना पोषक स्वरूपाचे आहे. वातावरण निर्मिती परिणामकारक करताना लेखक खोत यांनी कालतत्वं हे जाणीवपूर्वक सांभाळले आहे. जवळ जवळ सर्वच कथा वर्तमानकाळात घडत आहेत. एक दिवसात घडणाऱ्या घटना म्हणून 'महापूर, अदावत, इगत या कथांचा उल्लेख करता येईल. परंतु काही कथांच्या बाबतीत लेखकाने कालतत्व पाळलेच नाही. ढोबळ मानाने काहीही उल्लेख करून कथेंची

सांधेजोड केली आहे. 'तोडगा', 'ऐपत', 'नात्यानं बाप' इ. कथा वाचताना जाणवते. कौटुंबिक वातावरणात व्यक्तीच्या मनातील स्पंदने लेखकाने शब्दबध्द केली आहेत. त्यामुळे कथा उठावदार दिसते. वाटणीमधील म्हातारी - म्हाताऱ्याच्या संवादातून नेमकेपणाने त्याचे दुःख प्रकट होते पण त्या दुःखाची किनार अधिक भावविव्हल बनताना 'शेवग्यावरचं कावळं सारड्याचं लचकं तोडत होतं' आणि 'रक्ताळलेला सरडा शेवटचं आचकं देत होता.' अशा सारख्या वाक्यप्रयोगातून वर्णनशैलीतून ते गडद होत जाते. एखादा समरप्रसंग उभा करताना लेखक नेमकेपणाने पार्श्वभूमी तयार करतो. पावसाच्या अगोदरचे वातावरण महापूरमध्ये - ' उभ्या आडव्या वाऱ्यानं हैदोस मांडला होता. मुलखावेगळा वारा सुटला होता. आग्यावेताळासारखा वारा घुमत होता. गावंदरीची झाड ओणंवी होऊन भुईला नाक घासत होती.' ६ शिवाय हिराचं दुःख बोलकं करण्यासाठी लेखकाने 'आठ दिवस झालं रोजगारी माणसांचा रोजगार बंद झालेला. घरात होतं नव्हतं तेव्हढं कधीच संपलं होतं. उसणंपासनंही कोण देईना झाला. उपास-तापास करायची पाळी आली. कोण कोणाला आपल्या वळचणींला उभन राहू देईना. जाणती माणसं मुंडी घोणेत तोंड घालून दिवस ढकलत होती. तर लहान पोरं भाकरीसाठी लचकं तोड होती.' ७ अशी पार्श्वभूमी रेघाटून तिच्या दुःखीत कहाणीला बळ दिले आह. वातावरण निर्माण करण्याचे लेखकाचे खास तंत्र आहे. एक दोन वाक्यात एखादा दोन शब्दातून नाट्यात्मक कलाटणी देत प्रसंग उभा केला जातो. त्याला गहिरे रूप देऊ केले जाते. कुटुंबाचं - दारिद्रयाचं चित्रण - 'दातावर मारीन म्हटलं तरी तिच्याजवळ एक पैसा नव्हता.' 'महापूर'मधील ! 'आमी गरीब माणसं. ईक खाईन म्हटलं तर पैसे न्हाईत.' सीतानं दीनवाऱ्या चेहऱ्यानं म्हटलं 'आमी पगाराच्या दिशी दिण पैसं ' ८ अशा एक दोन वाक्यात लेखकाने प्रसंगातील गांभीर्य साक्षात केलेले आहे. व्यक्ती आणि घटना प्रसंग यातून परिणामकारक आशय निर्माण करून वाचकाला अंतर्भिमुख करणारी कथा खोत यांनी निर्माण केली आहे. 'वाटणी' कथेतील लिंबाजी व भागू यांच्या दीनवाण्या जगण्यातील कारूण्य उभा करताना लेखकाने म्हातारी भागू मळ्याकडे येते. येताना भाकरी खर्डाही घेऊन येते. म्हाताऱ्याला खायला घालते आणि खाता खाता आपली जीवन कर्मकहाणी आठवून आपल्या हृदयातील दुःखाला वाट करून देते. इतर वस्तूसारखी म्हातारा-म्हातारीची वाटणी करून त्यांची ताटातूट मुलं करता आहेत त्याचं दुःखित छाया सर्व कथावर

पसरली आहे.

**निवेदनशैली :-** आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाची निवेदनशैली ओघवत्या स्वरूपाची आहे. तिला तिचे म्हणून खास कसब प्राप्त झाले आहे. ग्रामीण जीवनातील कारूण्य स्पष्ट करण्यासाठी त्यांची लेखणी धारदार बनते. कथेचा प्रारंभ हा वर्तमानात झालेला असतो तर कालांतराने ती कथा भूतकाळात जाते व शेवट पुन्हा वर्तमानकाळात शेवट होतो. याला फ्लॅशबॅक मेथड म्हणतात. ती खास करून 'लेकावळा', 'तोडगा', 'जोसरा', 'पाटाचं पाणी', 'पाण्याविना मासोळी', 'नात्यानं बाप', 'कोंडमारा', 'घर आणि बंगला ' इ. कथा पाहण्यासारखी आहे. खोतांनी जे पाहिले, अनुभवलेल्या दुसऱ्यांच्या कथाही ते वर्णन करीत असतात. आप्पासाहेब खोत यांनी आपल्या जवळच्या आसपास घडणांऱ्या आपल्याच गावातील माणसांच्या दुःखत कथा व्यथा शब्दबध्द केल्या आहेत. महापूरमधील कथाची निवेदनशैली त्रयस्थ स्वरूपाची आहे. त्रयस्थ निवदेन पध्दती, निवेदकाला कथेतील व्यक्ती व घटना यांच्या परस्परसंबंधाची पूर्ण कल्पना असते. विश्वातल्या सर्व व्यवहारांचा साक्षी म्हणून तो त्रयस्थपणे घडणाऱ्या घटनांचे दर्शन घडवत असतो. तो कथाविषय आपण बाजूला उभे राहून पाहात आहोत अशा पध्दतीने वर्णन करीत असतो. अशा निवेदन पध्दतीस त्रयस्थ निवेदन पध्दती म्हणतात.[९] या दृष्टीने खोत यांच्या कथा लक्षात घेण्यासारख्या आहेत. लेखकाने प्रत्येक प्रसंग जणू जवळून पाहिला आहे. त्याला तो साक्षीभूत आहे असे वर्णन तो करतो आहे. महापूरमधील हिराचे दुःख, दैन्य आणि तिचा मृत्यू याचं हृदयद्रावक चित्रण करताना वाचवाऽऽ एक किंकाळी गावदरीच्या पाण्यात विरून गेली आणि हिरा वाहत्या पाण्याला लागली. असे लिहितो. निवेदन घडणाऱ्या घटनांचे दर्शनात्मक चित्रण एखाद्या छायाचित्रकाराने टिपून घ्यावे अशा रितीने खोत यांनी चित्रण केले आहे. 'धुर्पानं पुढच्या सोप्यात घोंगडं अंथरलं आकनीनं त्यावर जग ठेवला. आपण जवळ बसली. पदर पडला. जठा उघडी. तिनं भंडारा लिंबू उदबत्ती सुया कणकीच्या बाहुल्या सारं साहित्य घोंगड्यावर जगाच्या पुढं मांडलं. धुर्पानं पाण्याचा तांब्या आणून दिला.' १० अदावत तर काही ठिकाणी उपरोधिक निवेदनशैलीचा वापर केल्याचे दिसते. 'इगत' मध्ये 'सारा गाव वैतागून गेला होता. तलाठ्याला सारं गाव त्याला रावसाब म्हणायचं. काय रावसाहेबांचा रूबाब! गोरा गोमटा लालभडक गाजरासारखा गडी. श्रीधर कुलकर्णी त्याचं नाव. खरं सारी माणसं त्याला रावसाब

आपलं काम व्हावं म्हणून माणसं मोजून रूपये देत होती ते होतीच शिवाय कणसं, शेंगा, लसूण, कांदा, वाळकं, माळवं काय हाताला लागल जे घावल ते माणसं नेवून त्याच्या घरी पोहचवत होती.' ११ या सर्व वर्णनात उपरोधिकपणा आहे. सरकारी माणसाजवळ सामान्य माणूस कसं हतबल होतो आहे याचं दर्शन घडवताना लेखक रावसाहेबाचं व्यक्तिमत; शब्दशैलीतून उभा करताना दिसतो आहे.

एखादे विश्लेषण एखादी लकब एखादी कृती यातून संबंध व्यक्तिरेखा उभी करण्याची हातोटी लेखक खोत यांच्या निवेदनशैलीत आढळते. घरात वरचष्मा असलेली सासू धुर्पा, फुलाचा छळ करणारी सासू मनातून उदासीन असलेला लिंबाजी अशा कितीतरी व्यक्ती महापूर कथासंग्रहात आहेत. खोताची सूक्ष्मनिरीक्षण शक्तीच्या बळावर त्यांनी प्रभावी निवेदनातून व्यक्तीचा जीवनपट उलगडून दाखवला आहे.

**संवाद लेखन :** खोत यांच्या कथा संवादात्मक लेखनशैलीत अभिव्यक्त झाल्या आहेत. आजपर्यंत मराठी ग्रामीण कथेत अभावानेच आढळेल अशी संपूर्ण संवादात्मक कथा लिहिण्यात खोत यांचा पिंड विशेष दिसतो आहे. त्यांच्या बहुतेक कथांची सुरवातच संवादातून होत असते. उदा. 'कोंडमारा !'

- ' मंगल! ये मंगल !!' मंगलनं होकार दिला.

'घर आणि बंगला' 'बरं येतो दादा, येतो वहिनी !' आनंदनं स्कूटर सुरू केली.

'तोडगा' 'आयऽऽ ये आयऽऽ दार उघड' फुलानं दार घाबऱ्या घाबऱ्या धाड् धाड् वाजवले.

तशी हौसाला जाग आली. 'आग बाई फुली काय ?'

अशा रितीने महापूरमधील तीन कथांची संवादात्मक सुरूवात होऊन त्या गतजीवनाकडे आपल्या जीवनक्रमाकडे वळताना दिसतात. लेखक खोत यांची कथा पध्दत जसे पाहिले ऐकले ते तसेच्या तसे सांगण्याची असल्याने या कथातून आपोआपच संवाद व वस्तुनिष्ठ वर्णन या दोन्ही गोष्टी आल्या आहेत. 'वाटणी'मधील लिंबाजी भागू यांच्यामधील संवाद म्हातारपणाचं दु:ख बोलकं करून जाते. तर भीमा व लिंबाजी यांच्यातील संवाद वडील मुलगा यांच्या नात्यावर नव्यानं प्रकाश टाकते. 'पाण्याविना मासोळी' मधील मुंजळा स्वत:च स्वत: संवादातून आपलं अंतरिचं दु:ख व्यक्त करत राहते. 'पाटाचं पाणी' मधील बायजा व नानाच्या संवादातून नव्या विचाराचं रूप साकार होते आहे. शिवराम आणि आनंदा या भावाभावाच्या संवादातून

नातेसंबंधावर लेखकाने नेमकेपणाने भाष्य केले आहे. लेखक खोत यांच्या कथातील व्यक्तीचे भावविश्व साकार होताना आपली जीवघेणी वेदना स्पष्ट करताना त्या इतर प्रस्थापिताशी संवाद साधतात. त्याचं दुःख हे त्यांचच म्हणून आहे. कधी काळाने निर्माण केले तर काहीवेळा इतर व्यक्तीनी निर्माण केले हे दुःख भोगताना त्याच्या मानसिक ताणतणावाचे चित्रण लेखकाने नेमकेपणाने अभिव्यक्त केले आहे. उदा. 'परवड' ही कथा रामा आणि सीता यांच्या कौटुंबिक पती पत्नीच्या अंतरिक दुःखाचा आवेग त्यांच्याच मानसिक स्थितीचं प्रभावी दर्शन लेखकाने घडविताना संवादशैलीचा वापर परिणामकारकतेने केला आहे. शिवाय लेखक खोत यांची कथाकथन शैलीच्या अंगाने अभिव्यक्त होत असताना लेखक खास शब्द शैलीतून वाचकाशी थेट संवाद साधतो आहे. असे वाटते. उदा. 'थूऽऽ तुमच्या आयला' असं म्हणत शिवरामनं लिंबू भंडारा, सुया, बिब्ब बाहुल्या लाथनं उधळून म्हणाला, 'आये! तुला याड तर लागलं न्हाई! आगं म्हस आणाय रूपयं कमी पडतील म्हणून मीच तुझा बटवा घेऊन गेलो होतो.' तशी आकनीनं हाळी दिली. 'आई उदं उदं गं उदंऽऽऽ'१२ 'अदावत', 'ऐपत'- कमळीची सुली रूपानं आणि गुणानं चांगली होती. केवड्याच्या कणसासारखं तिचं रूप होतं. दहावी पास झाली. तिला पुढं शिकविणं कमळाला शक्य नव्हतं. आईबरोबर ती रोजगार करू लागली.

सुलाकडं काय होतं ती गरीबाघरची गाय. उठता बसता सासू जावा तिला टोचून बोलत होत्या. दुसऱ्या कळपातील पिलाला टोचावं तशा टोचत होत्या. सुलाचा कोंडमारा होत होता. यातून लेखकाने थेट वाचकाशी रसिकाशी संवाद साधला आहे. व्यक्ती व्यक्तीच्या दोन मनातील द्वंद्वातून लेखकाने घटना प्रसंग साक्षात साकार केले आहेत. त्यामुळे त्यांच्या एकूण कथेला वास्तवतेचा आधार अधिक मिळत्त जातो आहे. ती अधिक परिणामकारक वाचकाच्या हृदयाला जाणून भिडते आहे.

**मनोवर्णन –** लेखक खोत यांची कथा मनोविश्लेषण न करता मनोवर्णन करते आहे असे वाटते. यांनी आपल्या महापूर कथासंग्रहातून व्यक्तीचा, स्त्री-पुरूषांचा जीवनपट उलगडून दाखविला आहे. त्यातल्या त्यात ग्रामीण स्त्रीचं जीवघेणं दुःख, विधवा स्त्रियांच्या जीवनाची होणारी परवड लेखकाने शब्दबध्द केली आहे. दुःख, व्यथा, वेदना या जाणीवा व्यक्त करताना त्यांना पात्राच्या मानसिक स्थिती गतीचे सूक्ष्मपणे वर्णन केले आहे. पाण्याविना मासोळीमधील मंजुळाच्या मनाची स्थिती,

गती लेखकाने नेमकेपणाने अभिव्यक्त केली. परवडमधील रामा आणि सीता यांच्या मनाच्या स्पंदनाचे अनेक पापुद्रे लेखकाने स्पष्ट केले आहेत तर वाटणीमधील म्हातारी भागू आपल्या मनातील दुःखभाव म्हातारा लिंबाजी जवळ बोलून दाखवते आहे. हिरा स्वत:चे दुःख स्वत:च भोगते आहे. आपल्याच मनाची आपण मुरड घालून भावाच्या घरातून बाहेर पडते.

मानसिक ताण्याबाण्याचे अनेक कंगोरे लेखक खोत यांनी रेखाटताना त्या त्या व्यक्तीचा तोल सांभाळला आहे. कोंडमारामधील हौसा तिच्या मनाची होणारी स्थिती पाटाचं पाणी कथेतील बायजाला झालेला पश्चात्ताप आणि तात्याला १६ वर्षे पत्नी निघून गेल्याचं दुःख अंतरिक मानसिक वेदनेचं चित्रण चित्रित केले आहे. या व्यक्ती एक विशिष्ट परिस्थितीत जगताना स्वत:च स्वत: मनातून पेटून उठतात. परिस्थितीवर मात करण्याचं धैर्य त्यांना लाभते. 'ऐपत'मधील सुला, 'तोडगा'मधील फुला, या परिस्थितीपुढे हतबल न होता त्या परिस्थितीवर मात करत नव्यानं जीवनाला प्रारंभ करतात. फुला आपल्या सासूला नवऱ्या मारते. आपल्या आईने दिलेले सर्व साहित्य घेऊन माहेरी राहायला येते. अन्याय अत्याचाराला बळी पडलेली फुला आपले मनमोकळे करते. जीभ सैल सोडते. त्याचं वर्णन लेखकाने नेमक्या शबदात केले आहे. तिनं अंगणातून वीज कडकडावी तशी बोलायला सुरूवात केली. नवरा - नवरा म्हणून खूप सोसलं तू रांडाच्याकडं गेलास आणि मला नासीवलीस आसला नवरा असण्यापेक्षा नसल्याला काय वाईट ? एक झंपर शिवलं तर पाच रूपयं मिळतील आणि तुला मोकळा सोडणार नाही. पाटचा भाऊ नसला तर माझा मावसभाऊ वकील हाय. कोर्टातच तुला सोडचिठ्ठी देतो. आणि तू रांडाकडं गेल्यालं चालतं मग मी चार सोयरं ठेवती की ! ठेवं दे जग नावं कुणाला ठेवील मला. म्हणतील आमक्या तमक्याची बायकू चांगली वागत नाही. तुझीच बदनामी करते. तुला खडी फोडायला नाही लावली तर नावाची फुला नाही. आता हाच तोडगा. फुला बेभान होऊन बोलतच होती.[१३] फुलाच्या मनातील सल लेखका ने अभिव्यक्ती केली आहेच. तिला जगण्याचा आलेला त्रागा ही त्यातून स्पष्ट केला आहे. जे लग्न झाल्यापासून मनात कढत होतं ती बळ-बळ तिने अभिव्यक्त केल्याचे दिसते. महापूरमध्ये अशा कितीतरी व्यक्ती आपल्या मनातील दुःखाच्या व्यथा आपल्या कर्मकहाणीतून व्यक्त करताना दिसतात.

**भाषाशैली :-** महापूरमधील कथा वाचताना चटकन लक्षात येते ते म्हणजे भाषेचा लडिवाळपणा ! त्या भाषेचे सौंदर्य, शिवाय कथा प्रभावी होण्यासाठी आलंकृत भाषाशैलीपेक्षा साधी सरळ परंतु रोचक भाषाशैली अधिक परिणामकारक ठरते. आप्पासाहेब खोत यांची भाषा साधी सरळ आणि ओघवती आहे. ग्रामीण आणि नागर असे संमिश्र स्वरूप तिचे आहे. कथा निवेदकाची म्हणून नागर भाषा आणि पात्राची म्हणून ग्रामीण भाषा असे दोन स्तर भाषेचे सहजपणे लक्षात येतात. घटना प्रसंगानुसार कथाकार आप्पासाहेब खोत साधी सरळ सोपी वाक्यरचना करतो आहे असे जाणवते. ' हंऽऽ घ्या हिकडं ' त्यानं हात पुढं केला. चिलीम अंगठ्याजवळच्या बोटात धरली. दुसऱ्या हातानं त्याला जाम रेटा दिला आणि रेडकानं म्हशीचं थान चोकावं तसा बकाऽ बकाऽ धूर आत ओढला. पुन्हा अॅबऽ करून एकदम ओंजळभर धूर बाहेर सोडत म्हणाला, 'नाना, ही काय गोम आहे गा ?'१४ 'परवड' यातून पुढील घडणाऱ्या घटनेची संकेत स्पष्टीकरण. 'चार कर्ती माणसं उठली. तालुक्याला मोर्चा काढला आणि गावात दुष्काळी कामं आलं. कामावर रोजगार तसा बऱ्यापैकी, पर माणसाचं कामावर झगरं पडलं पिण्याच्या पाण्याची सोय टँकरनं करण्यात चार कर्ती माणसं हात धून लागली.१५ या वर्णनात लेखक सोप्या वाक्यरचनेतून प्रसंग उभा करतो आहे. खोत यांनी आपल्या कथाविश्वात अनेक भाषिक प्रयोग केले आहेत.

'बाळका !! बाळका !! ऽऽ !! रूपयं ऽऽ हिथंचऽऽ हाईत ऽऽ खरं दात ऽऽ बी आपलं!! आणि कऽऽ व्हटं बी आपलं ऽऽ तू - तू काय ऽऽ वळकायचं ते वळीक ऽऽऽ!! उदं गं ऽऽ उदं ग ऽऽ' १६ 'च्या ऽऽ आयची तिच्या ! चांगलीच इगत काढली की बाईनं गा !' १७

ग्रामीण शब्दप्रयोग करताना रेडिओ- रीडीव, वेळेला - येळंला, पोर - प्वार डोकं - डोसकं असे अनेक ग्रामीण शब्दप्रयोग नेमका आशय सूक्ष्म असा अनुभव जाणीव स्पष्ट करताना लेखकाने प्रत्येक कथेत वापरला आहे. शब्दप्रयोग वाक्य प्रयोग शब्दाच्या चमत्कृती करून कथा अधिक परिणामकारक केली आहे. शिवाय स्वत: लेखक कथाकथन करीत असल्याने ग्रामीण बोली भाषा संवादाची भाषा शब्दप्रयोग कथासंग्रहाच्या पानापानावर दिसतात.

'आरं माझ्या देवा तूरं ऽऽऽ आता मी काय बगूं गं ऽऽऽ मला परदेशी केलं गऽऽऽ'१८

'दिसत आसलं बाबा दिसत आसलं. न्हाई कुणी म्हंणायचं ? आरं ! काय ह्ये

आकरीत आलं. पैलं, पाणी काढून बघायचं आलं? तर चार वर्सात सिनेमागत बघायचं आलं आसंल बाबा. आलं आसलं न्हाई कुनी म्हणायचं ?'१९

'गप रडू नकं गप्प चला काय झालंया ते बघू तरी '

'नगं बाबा.. मी गेले की तिच्या सासूचं पीत खवळतया माझ्या लेकीला ती मारून टाकतील ऽऽऽ मग मी काय बघू ऽऽ' २०

तिनं गाठोडं सोडलं त्यानं चूळ भरली.

'भरलीसा चूळ. मग घ्या. खावा !'

'आणि तू ?'

'मला नकं मी घरात जाऊन खाईन !'

'माझ्या संगं, संग खाकी जरा '

'न्हवं तुला आठवतया का गं ?'

'काय ते वं ?' २१

यातून नेमकेपणाने खोत यांनी व्यक्तीच्या मनातील असलेली उबळ व्यक्त केलेली आहे. खोत यांची त्यांची म्हणून असलेली खास शैलीचा प्रत्यय येतो आहे. आजपर्यंत मराठी कथेत इतक्या सफाईदारपणे भाषिक आविष्कार अभावाने आढळेल या भाषिक प्रयोगातच त्यांच्या लेखनाचा वेगळेपणा लक्षात येतो. ग्रामीण भाषेतील वाक्यप्रचार म्हणी सहजपणे त्यांच्या भाषेत आविष्कृत होत आहेत.

'जेवढी शिकल्याली तेवढली भकल्याली'

'रडून रडून काय कयगडून गेली.'

'पोरं भिदरलं'

'तिला आता कुठली आली या आंजीता ? दावणीला गुतापलेल्या म्हसरागत तिची गत झाली या '

'दूध चुलीवर आणि ही चावडीवर '

'जशी करणी करावी तशीच भरावी गा !'

'गावाला गेल्यालं आमचं मालक आणि पाण्यात पडलेला रेडा दोन्ही सारखंच की ! ' काही ठिकाणी प्रतिमा प्रतिकाच्या माध्यमातून प्रसंगातील भाव प्रकट करत जाणं हा त्यांच्या भाषेचा खास स्वभाव आहे. त्याचं भाषेचं वैशिष्ट्य म्हणजे कोल्हापूरच्या ईशान्य परिसरातील स्त्री भाषेचा खास नमुना. 'आनसा पाणी वत

आंघुळीला. मी आलोच चुळी-लुगडं घेऊन.[२२] ''काटवट बाजूला सारली आणि एका कळंत बाळंतपण झालं. सुटलो ल्गीच.'[२३] स्त्रीच्या तोंडी पुरूषबोलीचे शब्द आढळतात. पुरूषी वळणाने स्त्री भाषेचा आविष्कार हा विशेष खोत यांच्या भाषाशैलीचा आहे.

आशय विषय आणि आविष्कार या अंगाने खोत यांची कथा मराठी ग्रामीण कथा साहित्यात खास स्वतःचे म्हणून विश्व साकार करते आहे. आजवर त्यांनी जे लिहिले आहे ते त्यांनी आपल्या अनुभूतीला साक्षी ठेवून आविष्कृत केले आहे. त्यांच्या कथेतून नवा माणूस घडविण्याचा माणुसकी जपण्याचा मानवी मनाच्या वर्णनाचा आणि त्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते. ग्रामीण माणसाची व्यथा वेदना दुःख व्यक्त करणं हा खास त्यांचा पिंड आहे. तो 'महापूर'-मध्ये साकारला आहे. माणूस माती याचं नातं सांगणारी कथा एक नव्या वळणावर उभी आहे. त्या नात्याचे अनेकविध धुमारे वेधू पुढच्या त्यांच्या लेखनातून अधिक सकसपणे चित्रित होतील अशी अपेक्षा करावी वाटते..

**संदर्भ टीपा :**


१) महापूर : आप्पासाहेब खोत : प्रियदर्शी प्रकाशन : द्वितीय आवृत्ती : १९९९ : पृ.४८

२) उणी : पृ. ६

३) उणी पृ. ५४

४) वाङ्मय प्रकार : आकलन आणि रसास्वाद : कथा : य. च. म. मुक्त विद्यापीठ : प्रथम प्रकाशन : १९९१ : प्रास्ताविक : पृ. १२

५) दै. पुढारी : प्रा. श्याम माने : रविवार पुरवणी : पृ. ३

६) महापूर : आप्पासाहेब खोत : प्रियदर्शी प्रकाशन : द्वितीय आवृत्ती : १९९९ पृ. ५

७) उणी : पृ. ६

८) उणी : पृ. ६०

९) वाङ्मय प्रकार : आकलन आणि रसास्वाद : कथा : य. च. म. मुक्त विद्यापीठ : प्रथम प्रकाशन : १९९१ : पृ. २३

१०) महापूर : आप्पासाहेब खोत : प्रियदर्शी प्रकाशन : द्वितीय आवृत्ती : १९९९: पृ.२८

११) उंणी : पृ.१३१

१२) उणी : पृ. २९
१३) उणी : पृ. ७३
१४) उणी : पृ. ७५
१५) उणी : पृ. ५४
१६) उणी : पृ. २९
१७) उणी : पृ. ७८
१८) उणी : पृ. ११०
१९) उणी : पृ. १०९
२०) उणी : पृ. ६८
२१) उणी : पृ. ५०